RNI No. MAHBIL/2009/31748
Reg. No. MCS/174/2016-18

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग एक-अ—मध्य उप-विभाग

**वर्ष २, अंक १७]** **मंगळवार, मार्च २९, २०१६/चैत्र ९, शके १९३८** **[ पृष्ठे २, किंमत : २६.००**

**असाधारण क्रमांक २२**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण आणि स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम यांखालील (भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आदेश व अधिसूचना यांव्यतिरिक्त) आदेश व अधिसूचना.**

**नगरविकास विभाग**
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २९ मार्च २०१६

**अधिसूचना**

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम.**

क्रमांक स्थासंक २०१६/प्र. क्र. १४/२०१६/नवि-३२.— ज्याअर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) नियम, २०१० याच्या नियम ४८ च्या उप-नियम (९) च्या खंड (क) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासनाने, **महाराष्ट्र शासन राजपत्र,** असाधारण, भाग एक-अ मध्य उप-विभाग, दिनांक १७ जून २०१५ यामध्ये प्रसिद्ध करण्यात आलेली शासकीय अधिसूचना, नगरविकास विभाग क्रमांक : स्थासंक २०१५/नवि-३२, दिनांक १७ जून २०१५ द्वारे, महाराष्ट्र महानगरपालिका स्थानिक संस्था कर अभय योजना, २०१५ (यात यानंतर जिचा निर्देश " अभय योजना " असा करण्यात आला आहे.) या अंतर्गत दाखल करावयाच्या विवरणांचे निर्धारण पूर्ण करण्यासाठीचा दिनांक १५ ऑगस्ट २०१५ वरून ३१ मार्च २०१६ पर्यंत वाढविला होता ;

आणि ज्याअर्थी, प्रलंबित अशा स्थानिक संस्था कराची अधिक चांगली वसुली करता यावी म्हणून, उक्त अभय योजनेअन्वये दाखल करावयाच्या विवरणांचे निर्धारण पूर्ण करण्यासाठीचा दिनांक ३१ मार्च २०१७ पर्यंत वाढवण्याकरिता, उक्त योजनेमध्ये सुधारणा करणे इष्ट असल्याचे शासनाचे मत आहे :—

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) नियम, २०१० च्या कलम ४८ मधील उप-नियम (९) च्या खंड (क) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबतीत समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, उक्त अभय योजनेमध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहे :—

उक्त अभय योजनेमधील खंड (३) मध्ये, उप-खंड (नऊ) ऐवजी पुढील उप-खंड दाखल करण्यात येईल :—

" (नऊ) अभय योजना, २०१५ अन्वये दाखल करावयाच्या विवरणांचे निर्धारण दिनांक ३१ मार्च २०१७ पूर्वी करण्यात येईल ".

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सुधाकर ज्ञा. बोबडे,**
शासनाचे उप सचिव.

## URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Hutatma Rajguru Chowk, Madam Cama Marg, Mantralaya,
Mumbai 400 032, dated 29th March 2016

*NOTIFICATION*

MAHARASHTRA MUNICIPAL CORPORATIONS ACT.

No. LBT. 2016/CR-14/2016/UD-32.—Whereas, in exercise of the powers conferred under clause (*a*) of sub-rule (9) of rule 48 of Maharashtra Municipal Corporations (Local Body Tax) Rules, 2010, the Government of Maharashtra has *vide* the Government Notification, Urban Development, Department, No. LBT 2015/C.R. 82/2015/UD-32, dated the 17th June 2015, published in the *Maharashtra Government Gazette,* Extraordinary, Part-I-A Central sub-section, dated the 17th June 2015, extended the date for completing the assessment of returns filed under the Maharashtra Municipal Corporation Local Body Tax Amnesty Scheme, 2015 (hereinafter referred to as the " Amnesty Scheme "), from 15th August 2015 to the 31st March 2016 ;

And whereas, the Government is of opinion that for the better recovery of pending Local Body Tax, it is expedient to amend the said Amnesty Scheme to extend the date for completing the assessment of returns filed under the said Amnesty Scheme upto 31st March 2017 ;

Now, therefore, in exercise of the powers conferred under clause (*a*) of sub-rule (9) of rule 48 of Maharashtra Municipal Corporations (Local Body Tax) Rules, 2010, and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby makes the following amendments to the said Amnesty Scheme, namely :—

In the said Amnesty Scheme, in clause 3, for sub-clause (*ix*), the following sub-clause shall be substituted, namely :—

" (*ix*) The assessment of returns filed under Amnesty Scheme, 2015 shall be completed before 31st March 2017."

By order and in name of the Governor of Maharashtra,

SUDHAKAR D. BOBADE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.